मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पुन्हा एकदा इंद्रायणी नदी फेसाळली

**नदी फेसाळल्यामुळे वारकऱ्यांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं : यंत्रणा कागदोपत्री नोटीस काढण्यापलिकडे काहीच करत नसल्याने वारकऱ्यांमध्ये तीव्र संताप**

**पिंपरी | प्रतिनिधी**

आळंदी मध्ये पुन्हा एकदा इंद्रायणी नदी फेसाळली आहे. अवघ्या महाराष्ट्राच श्रद्धास्थान असलेल्या माऊलींच्या आळंदीत इंद्रायणी मध्ये वारकरी पवित्र स्थान करत असतात. परंतु, नदी फेसाळल्यामुळे वारकऱ्यांचं आरोग्य धोक्यात येऊ शकतं. वर्षभरात दहा वेळी नदी फेसळली पण महापालिका प्रशासन, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण महामंडळ, आळंदी पालिका या सर्व यंत्रणा कागदोपत्री



नोटीस काढण्यापलिकडे काहीच करत नसल्याने वारकऱ्यांमध्ये तीव्र संताप आहे.

इंद्रायणी नदी ही वारंवार फेसाळते आहे. आज देखील इंद्रायणी नदीत पांढरे शुभ्र मोठ- मोठे बर्फासारखे तुकडे पाण्यावर तरंगत आहेत. गेल्या कित्येक महिन्यापासून आळंदीकर आणि वारकऱ्यांकडून इंद्रायणी नदी स्वच्छ करण्याबाबत आवाहन केलं जात आहे. तसेच काही राजकीय पक्षांनी देखील इंद्रायणी नदी काठावर आंदोलन करून इंद्रायणी प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आणला होता. माजी मुख्यमंत्री तथा सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील इंद्रायणी प्रदूषण मुक्त करण्याचा आश्वासन दिलं होतं. त्यानंतर प्रशासनामार्फत काही पावलं उचलण्यात आली. परंतु, आज पाहिलं तर नदीची अवस्था जैसे थे असल्याचं पाहायला मिळत आहे. खासदार आणि आमदार यावर कुठलाही मुद्दा अधिवेशनात किंवा संसदेत दिसत उपस्थित करत नाहीत. केवळ हिंदुत्वाचा मुद्दा घेऊन आपली महत्वकांक्षा प्राप्त करायची असाच अजेंडा राजकीय नेत्यांचा दिसत आहे.

## श्री खंडोबा देवाच्या सोमवती यात्रेच्या अनुषंगाने वाहतुकीत बदल

**आदेश प्र. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी संतोष पाटील यांनी जारी केले**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील जेजुरी येथे ३० डिसेंबर रोजी श्री खंडोबा देवाच्या सोमवती यात्रेच्या अनुषंगाने वाहतूक कोंडी होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी म्हणून वाहतुकीत बदल करण्यात आल्याचे आदेश प्र. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी संतोष पाटील यांनी जारी केले आहेत.



वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून ३० डिसेंबर रोजी पहाटे ५ वाजेपासून ते रात्री १२ वाजेपर्यंत सोमवती अमावस्या यात्रेकरीता येणारी हलकी व इतर वाहने वगळून जड-अवजड वाहतूक बंद करुन अन्य पर्यायी मार्गाने वळविण्यात येणार आहे.

जेजुरी पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण हद्दीतील वाहतूक बदल : सातारा, फलटण, लोणंद, बारामती येथून पुणे येथे जाण्याकरीता जेजुरी-सासवडकडे येणारी वाहनांची वाहतूक पूर्णपणे बंद करुन त्यावरील वाहने नीरा-मोरगाव- सुपा ते केडगाव चौफुला मार्गे सोलापूर महामार्गाने पुणेकडे वळविण्यात येत आहे. पुण्याकडून बारामतीकडे येणारी वाहतूक बेलसर- कोथळे- नाझरे- सुपे-मोरगाव रोड मार्गे बारामती किंवा फलटण या मार्गे वळविण्यात येत आहे.

सुपा पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण हद्दीतील वाहतूक बदल : बारामती व नीरा बाजूकडून जेजुरी मार्गे पुणे बाजूकडे जाणारी वाहनांची वाहतूक बंद करुन ती मोरगाव-सुपा-केडगाव चौफुला मार्गे सोलापूर महामार्गाने पुणेकडे वळविण्यात येत आहे.

सासवड पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण हद्दीतील वाहतूक बदल : पुणे बाजूकडून जेजुरी मार्गे फलटण-सातारा बाजुकडे जाणारी वाहनांची वाहतूक पुर्णपणे बंद करुन सासवड- नारायणपूर-कापूरहोळ मार्गे सातारा-फलटण किंवा सासवड-वीर फाटा-परींचे-वीर-वाठार मार्गे लोणंद या मार्गे वळविण्यात येत आहे.

## मावळमधील भाविकांच्या बसचा पंढरपूरजवळ अपघात

**भाविकांची बस आणि भरधाव ट्रकची समोरासमोर धडक झाली.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

देवदर्शनासाठी गेलेल्या मावळ तालुक्यातील भाविकांच्या बसचा पंढरपूरनजीक भीषण अपघात झाला आहे. रविवारी (दि.२९) सकाळी सव्वासहा वाजता पंढरपूर तालुक्यातील भटुंबरे येथे हा अपघात झाला. भाविकांची बस आणि भरधाव ट्रकची समोरासमोर धडक झाली.



यात बसमधील दोन भाविकांचा गंभीर जखमी झाल्याने मृत्यू झाला आहे. तर उर्वरीत ३२ जण जखमी असून यातील १२ जण गंभीर जखमी आहेत. बेबीबाई सोपान म्हाळसकर (रा. नाणे, ता. मावळ) व जान्हवी म्हाळसकर (वय ७, रा. नाणे, ता.मावळ) अशी अपघातात मृत पावलेल्यांची नावे आहेत.

बसमधील बहुतांश भाविक हे मावळमधील नाणे गाव व लोणावळा येथील रहिवासी आहेत. सर्वजण जवळील नातलग व कुटुंबीय असल्याची माहिती प्राप्त होत आहे. राजनंदिनी ट्रॅव्हल्सच्या बसने (एमएच १४/एलएस ३९५५) पंढरपूर येथे देवदर्शनासाठी जात होते. पंढरपूरमधील भटुंबरे गावाजवळ त्यांच्या बसचा व ट्रकचा समोरासमोर अपघात झाला. हा अपघात इतका भीषण होता की बस व ट्रकच्या समोरील भागाचा चक्काचूर झाला आहे.

दोन्ही वाहने अतिवेगात असल्याने अपघाताची तीव्रता अधिक होती. बसमधील एक मुलगी व एक महिला जागीच मृत पावली. जखमींपैकी गंभीर जखमी असलेल्या १२ जणांना तत्काळ सोलापूर येथे हलविण्यात आले. इतर २० जणांवर पंढरपूर येथील रुग्णालयात उपचार सुरु आहेत. अपघाताची माहिती मिळताच नाणे गावावर शोककळा पसरली असून अपघातग्रस्तांचे नातेवाईक तत्काळ पंढरपूरच्या दिशेने रवाना झाले.

अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमी प्रवाशांना बाहेर काढले. जखमींना रुग्णालयात हलविण्यात आले. अपघातामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. दोन्ही बाजुने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. अपघातग्रस्त वाहने रस्त्यातून बाजुला करण्यात आली व वाहतूक सुरळीत करण्यात आली.

# विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी ग्रामीण पोलिसांकडून कडक बंदोबस्त

## कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यानिमित्त आंबेडकरी चळवळीतील अनुयायांची होणारी गर्दी विचारात घेऊन पोलिसांकडून कडक बंदोबस्त तैनात

**पुणे | प्रतिनिधी**

कोरेगाव भीमा येथील विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यानिमित्त एक जानेवारी रोजी आंबेडकरी चळवळीतील अनुयायांची होणारी गर्दी विचारात घेऊन ग्रामीण पोलिसांकडून कडक बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. गर्दीचे नियोजन करण्यासाठी ग्रामीण पोलिसांकडून चार हजार ८०० पोलीस कर्मचारी बंदोबस्तात तैनात करण्यात येणार आहे.

विजयस्तंभ अभिवादन सोहळ्यासाठी राज्यासह परराज्यातून मोठ्या संख्येने अनुयायी येतात. या भागातील वाहतूक सुरळीत ठेवणे, तसेच गर्दीचे नियोजन करण्याच्यादृष्टीने बंदोबस्ताची आखणी करण्यात आली आहे, अशी माहिती पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी रविवारी पत्रकार परिषदेत दिली. अतिरिक्त पोलीस अधीक्षक रमेश चोपडे यावेळी उपस्थित होते. गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी विशेष पथक तयार करण्यात आले आहे. घातपाती विरोधी पथके तैनात राहणार आहेत, असे त्यांनी नमूद केले.



### वाहने लावण्याची व्यवस्था

» नगर रस्त्याने येणाऱ्या अनुयायींच्या वाहनांसाठी शिक्रापूर (वक्फ बोर्ड) येथे ५९ एकर जागेवर वाहने लावण्याची व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या जागेवर किमान आठ हजार वाहने लावता येतील, तसेच मुंबई-ठाणे परिसरातून येणाऱ्या वाहनांसाठी चाकण रस्त्यावर २३ एकर जागेवर वाहने लावण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या जागेत किमान चार हजार ८०० वाहने लावणे शक्य होईल. पीएमपीएल बससाठी शिक्रापूर परिसरातील बजरंगवाडीत दहा एकर जागेत पार्किंग व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तेथून अनुयायींना वढू बुद्रुक येथे जाण्यासाठी बस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. कोरेगाव भीमा येथील इनामदार पार्किंगच्या ठिकाणी पीएमपी बस अनुयायांना सोडतील. डिग्रजवाडी फाटा परिसरातून परतणाऱ्या अनुयायांसाठी पीएमपी बसची व्यवस्था करण्यात आली आहे..

बंदोबस्तास ३३६ पोलीस अधिकारी, तीन हजार ८० पोलीस कर्मचारी, गृहरक्षक दलाचे दीड हजार जवान, राज्य राखीव पोलीस दलाच्या (एसआरपीएफ) १२ तुकड्या तैनात करण्यात येणार आहेत. अग्निशमन दलाचे जवान तेथे तैनात राहणार आहेत. आत्पकालिन परिस्थित त्वरीत वैद्यकीय सुविधा देण्यात येणार आहेत. वैद्यकीय तज्ज्ञांचे पथक तेथे राहणार आहे. आपत्ती व्यवस्थापनाच्या दृष्टीने साधनसामुग्री प्रशासनाने उपलब्ध करुन देण्यात आली आहे. मोठ्या संख्येने अनुयायी येणार असल्याने चाकण रस्त्यावर २३ एकर जागेवर वाहने लावण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तेथून अनुयायांना विजयस्तंभापर्यंत पोहोचण्यासाठी तसेच परतण्यासाठी बस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत, असे पोलीस अधीक्षक देशमुख यांनी सांगितले.

पीएमपीएल बससाठी शिक्रापूर परिसरातील बजरंगवाडीत दहा एकर जागेत पार्किंग व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तेथून अनुयायींना वढू बुद्रुक येथे जाण्यासाठी बस उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. कोरेगाव भीमा येथील इनामदार पार्किंगच्या ठिकाणी पीएमपी बस अनुयायांना सोडतील. डिग्रजवाडी फाटा परिसरातून परतणाऱ्या अनुयायांसाठी पीएमपी बसची व्यवस्था करण्यात आली आहे.

### कोरेगाव भीमा दृष्टीक्षेपात बंदोबस्त

- » चार हजार ८०० पोलीस कर्मचारी बंदोबस्तात
- » राज्य राखीव पोलीस दलाच्या १२ तुकड्या
- » घातपात विरोधी पथक, अग्निशमन दल, वैद्यकीय पथक तैनात
- » र्किंगसाठी प्रशस्त जागा
- » अभिवादनस्थळी ने-आण करण्यासाठी पीएमपी बस
- » गर्दीचे नियोजन करण्यास प्राधान्य

# हिरव्या रंगावर भगवा रंग; खासदार मेधा कुलकर्णी यांच्या कृतीची चर्चा

## राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी यासंदर्भातील पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील सदाशिव पेठेतील एका भिंतीला दिलेला हिरवा रंग हटवून तिथे भगवा रंग देण्यात आला आहे. राज्यसभा खासदार मेधा कुलकर्णी यांनी यासंदर्भातील पोस्ट सोशल मीडियावर शेअर केली आहे, जी सध्या जोरदार व्हायरल होत आहे. या घटनेमुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

सदाशिव पेठेतील ज्ञानप्रबोधिनी शाळेच्या शेजारील एका गल्लीत हिरव्या रंगाने रंगवलेल्या भिंतीवर फुले, अगरबत्ती, आणि चादरींच्या साहाय्याने पूजा करण्यात आल्याची माहिती व्हायरल झाली होती. याची माहिती मिळाल्यानंतर खासदार मेधा कुलकर्णी स्वत: त्या ठिकाणी पोहोचल्या. पाहणी करून त्यांनी हिरव्या रंगावर भगवा रंग चढवला आणि त्या जागी गणपतीची प्रतिमा ठेवली. याचे फोटो आणि व्हिडिओ त्यांनी समाजमाध्यमांवर शेअर केले आहेत.

खासदार मेधा कुलकर्णी यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, "पुण्यासह महाराष्ट्रात विविध ठिकाणी अशा घटना वाढत आहेत. छोट्या स्वरूपात सुरू होणारी ही ठिकाणे नंतर काबीज केली जातात. हिंदूंनी जागरूक राहून सतर्कता दाखवावी."



### विरोधकांचा हल्लाबोल

» या प्रकरणावर शिवसेना (उबाठा) नेत्या सुषमा अंधारे यांनी टीका केली आहे. त्यांनी म्हटले आहे, "धर्मप्रचार करायचा असेल तर साध्वी व्हा, पण लोकप्रतिनिधी म्हणून जनतेच्या खऱ्या समस्यांवर लक्ष द्या. पुण्यातील अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटनांवर आवाज उठवा, पीडितांना न्याय मिळवून द्या. असा बालिशपणा करण्याऐवजी जास्त महत्त्वाच्या मुद्द्यांवर काम करा."

कुलकर्णी यांच्या या कृतीवरून आणि पोस्टवरून राजकीय वातावरण तापले आहे. समर्थक या कृतीला "हिंदू अस्मितेचे रक्षण" म्हणत आहेत, तर विरोधक याला "दिखावा" आणि "जनतेच्या खऱ्या समस्यांपासून लक्ष विचलित करण्याचा प्रयत्न" असे म्हणत आहेत.

सध्या हा विषय सोशल मीडियावर चर्चेचा केंद्रबिंदू बनला आहे. यावरून येत्या दिवसांत आणखी वाद निर्माण होण्याची शक्यता आहे.

# पुणेकरांच्या खिशाला आणखी कात्री ! CNG च्या दरामध्ये पुन्हा वाढ

## महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने 'सीएनजी'च्या दरात प्रतिकिलो 1.10 रुपयांची वाढ करण्याची घोषणा केली.

**पुणे | प्रतिनिधी**

पुणेकरांच्या खिशाला आणखी कात्री लागणार आहे, कारण, CNGच्या दरांमध्ये पुन्हा वाढ करण्यात आली आहे. एमएनजीएलकडून सीएनजीच्या दरांमध्ये 1.10 रुपये प्रति किलो इतकी दरवाढ करण्यात आली आहे. सी एन जी साठी आता नवीन किंमत 89 रुपये प्रति किलो इतकी राहणार आहे. याआधी सीएनजीचा दर 87.90 प्रति किलो इतकी होता. आता पुणे, पिंपरी-चिंचवड शहरासह जिल्ह्यात सीएनजीचे नवीन दर 89 रुपये प्रतिकिलोवर पोहचले आहेत. ही दरवाढ जागतिक बाजारातील चढ-उतारांचा थेट परिणाम असल्याचे सांगितले जातं आहे.

महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेडने (एमएनजीएल) 'सीएनजी'च्या दरात प्रतिकिलो 1.10 रुपयांची वाढ करण्याची घोषणा केली. नवीन आज



पासून हे दर लागू झाले असून पुणे आणि परिसरात दर 89 रुपये प्रतिकिलो रुपये प्रतिकिलो झाला आहे. या दरवाढीमुळे 'सीएनजी'वर धावणाऱ्या वाहनांच्या खर्चात वाढ झाली आहे.

या आधी विधानसभा निकालापूर्वी राज्यात 'सीएनजी'च्या दरात वाढ झाली होती. पेट्रोल, डिझेलचे दर वाढले म्हणून वाहनचालक 'सीएनजी'कडे वळले आहेत. त्यात आता 'सीएनजी'च्या दरातही वाढ झाल्याने सर्वसामान्यांच्या खिशाला झळ पोहोचत आहे, त्यामुळे त्यांची अवस्था दुष्काळात तेरावा महिना अशी झाली आहे.

शहरात साधारण सर्व रिक्षा 'सीएनजी'वर चालतात. यामुळे ही दरवाढ खिशाला चटका देणारी आहे. याकडे शासनाने गांभिर्याने लक्ष दिले पाहिजे. कारण सार्वजनिक आणि खासगी वाहतूक 'सीएनजी'वर अवलंबून आहे. दरात वाढ झाल्यामुळे व्यवसाय करणे अशक्य झाल्याचे रिक्षा चालकांचे म्हणणे आहे.

# वर्षभरात शहरातील 1,204 युवकांना नोकरी

**कौशल्यम उपक्रमा अंतर्गत, 2024-25 या वर्षात पिंपरी चिंचवड क्षेत्रातील युवकांना नोकरी मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली गेली आहे.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

कौशल्यम उपक्रमा अंतर्गत, 2024-25 या वर्षात पिंपरी चिंचवड क्षेत्रातील 1204 युवकांना नोकरी मिळवून देण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली गेली आहे. हे युवक आता त्यांच्या आवडत्या क्षेत्रात करियर करत असून, आर्थिकदृष्ट्या सक्षम बनले आहेत, अशी माहिती उपायुक्त अण्णा बोदाडे यांनी देत, महापालिकेच्या औद्योगिक क्षेत्रातील महत्व अधोरेखित करत, रोजगार मेळाव्याचा लाभ घेत आत्मनिर्भर होण्याचे आवाहन केले.

पिंपरी चिंचवड महापालिका, लाईट हाउस कम्युनिटीज फाउंडेशन व पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी स्मार्ट सारथी यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवड येथील ऑटो क्लस्टर येथे नोकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याला युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून 1200 हून अधिक युवकांनी नोंदणी केली.



### आणखी 4 ठिकाणी सुरू होणार लाईट हाऊस

» पिंपरी चिंचवड क्षेत्रातील 11 ठिकाणी लाईट हाऊस कौशल्य विकास आणि रोजगार केंद्र स्थापन करण्यात आले आहे. हे केंद्र पिंपरी, चिंचवड, निगडी, भोसरी, बोपखेल, बोऱ्हाडेवाडी, दापोडी, नेहरूनगर, आकुर्डी, किवळे, आणि चिखली या भागांत कार्यरत आहेत. लवकरच अजून 4 ठिकाणी अशा स्वरूपाची केंद्रे सुरू होणार आहेत.

अनेक युवकांनी या संधीचा लाभ घेत विविध कंपन्यांमध्ये नोकरी मिळवून आर्थिक स्थैर्याचा मार्ग स्वीकारला आहे. या नोकरी मेळाव्याचे उद्घाटन महापालिकेचे उपायुक्त अण्णा बोदाडे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते. यावेळी स्मार्ट सिटी कंपनी सेक्रेटरी चित्रा पणवार, लाईट हाउस कम्युनिटीज फाउंडेशनच्या मुख्य कार्यक्रम अधिकारी अमृता बहुलेकर, कौशल्य प्रकल्प प्रमुख समीर शेख व ग्लोबल ऑपॉर्च्युनिटी युथ नेटवर्कचे सुब्रत नायक आदी उपस्थित होते. यावेळी समीर शेख, अमृता बहुलेकर व सुब्रत नायक यांनी युवकांना मार्गदर्शन केले.

कॉम्पुटर ऑपरेटर, हेल्थ, जिम इन्स्ट्रक्टर, नर्सिंग सहायक, ग्राफिक डिझाइन, सॉफ्टवेअर लँग्वेजेस हे व इतर अनेक कोर्सेस उपलब्ध आहेत. नोकरीला लागण्यापूर्वीचे ट्रेनिंग, रिझ्युमे तयार करणे, मुलाखतीची तयारी करून घेणे आणि मुलाखतीच्या संपूर्ण प्रक्रियामध्ये प्रत्येक व्यक्तीला वैयक्तिक सहाय्य करणे हे या टप्प्यावरील महत्वाचे मुद्दे आहेत.

### कोरेगाव भीमा दृष्टीक्षेपात बंदोबस्त

» काही कोर्सेस पूर्णपणे मोफत असतात तर काही कोर्सेसला नाममात्र शुल्क आकारले जात आहे. कॉम्पुटर ऑपरेटर, हेल्थ, जिम इन्स्ट्रक्टर, नर्सिंग सहायक, ग्राफिक डिझाइन, सॉफ्टवेअर लँग्वेजेस हे व इतर अनेक कोर्सेस उपलब्ध आहेत. नोकरीला लागण्यापूर्वीचे ट्रेनिंग, रिझ्युमे तयार करणे, मुलाखतीची तयारी करून घेणे आणि मुलाखतीच्या संपूर्ण प्रक्रियामध्ये प्रत्येक व्यक्तीला वैयक्तिक सहाय्य करणे हे या टप्प्यावरील महत्वाचे मुद्दे आहेत.

### लाईटहाऊस केंद्राची माहिती

» लाईटहाऊस मध्ये नाव नोंदणी केल्यावर, प्रत्येक विद्यार्थ्याला फाउंडेशन कोर्स उपलब्ध आहे. हा कोर्स सर्वांसाठी मोफत असून, याचा कालावधी 22 दिवसांचा आहे. या कोर्स मध्ये विद्यार्थ्यांना डिजिटल ट्रेनिंग दिले जाते, त्यांना इंग्रजी संभाषणाचे प्रशिक्षण मिळते. मुलाखतीची तयारी करून घेतली जाते, यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास तर वाढतोच

# गुन्ह्यातून आरोपीचे नाव वगळणे पडले महागात

**पोलीस उपनिरीक्षकाचे केले तडकाफडकी निलंबन, पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी संबंधित गुन्हेगाराला तत्काळ बेड्या ठोकण्याचे आदेश दिले.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

सराईत गुन्हेगाराने साथीदारांच्या मदतीने एकावर खुनी हल्ला चढवला. ही घटना रविवारी (दि. २२) काळेवाडी येथे घडली. दरम्यान, शहरातील एका बड्या नेत्याने स्थानिक पोलिसांवर दबाव टाकल्याने सराईत गुन्हेगाराचे नावच गुन्ह्यातून वगळले. याबाबत माहिती मिळताच पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी संबंधित गुन्हेगाराला तत्काळ बेड्या ठोकण्याचे आदेश दिले.

सराईत गुन्हेगाराने साथीदारांच्या मदतीने एकावर खुनी हल्ला चढवला. ही घटना रविवारी (दि. २२) काळेवाडी येथे घडली. दरम्यान, शहरातील एका बड्या नेत्याने स्थानिक पोलिसांवर दबाव टाकल्याने सराईत गुन्हेगाराचे नावच गुन्ह्यातून वगळले. याबाबत माहिती मिळताच पोलीस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी संबंधित गुन्हेगाराला तत्काळ बेड्या ठोकण्याचे आदेश दिले. तसेच, राजकीय दबावाला बळी पडणाऱ्या पोलीस उप निरीक्षकाचे तडकाफडकी निलंबनदेखील केले.




### लोकप्रतिनिधीकडून आरोपांच्या फैरी

» आपण सांगूनही कारवाई केल्याचा राग आल्याने संबंधित लोकप्रतिनिधीने पोलीस प्रशासनावर पक्षपातीपणाचा आरोप केला आहे. तसेच, पोलीस हप्तावसुली करत असल्याचेही जाहीररीत्या सांगितले. मात्र, वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी राजकीय दबाव झुगारल्याने आरोप होत समोर आल्याने राजकीय वर्तुळात एकच खळबळ उडाली.

जीवघेण्या हल्ल्यातील गुन्ह्यात आरोपी असलेल्या सराईत गुन्हेगाराला पाठीशी घालणे काळेवाडी पोलीस ठाण्यातील फौजदाराला (पीएसआय) चांगलेच भोवले आहे. या फौजदाराचे तडकाफडकी निलंबन करण्यात आले. पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी याबाबतचे आदेश प्रसृत केले आहेत.

सचिन चव्हाण असे निलंबित केलेल्या फौजदाराचे नाव आहे. तरुणावर जीवघेणा हल्ला केल्याचा प्रकार रविवारी (२२ डिसेंबर) काळेवाडीतील पवनानगर येथे घडला. याप्रकरणी अनुप भोसले याला काळेवाडी पोलिसांनी अटक केली. तर, अक्षय भोसले, प्रणव गवळी यांच्यावर गुन्हा दाखल केला. मात्र, या घटनेत सराईत गुन्हेगार प्रशांत भानुदास दिघे (वय ३२, रा. काळेवाडी) याचाही सहभाग असल्याचे फिर्यादीचे म्हणणे होते. मात्र, फौजदार सचिन चव्हाण यांनी प्रशांत दिघे याचे नाव गुन्ह्यात घेतले नाही. सत्ताधारी महायुतीतील शहरातील एका बड्यानेत्याने स्थानिक पोलिसांवर दबाव टाकल्याने सराईत गुन्हेगाराचे नावच गुन्ह्यातून वगळण्यात आले होते. याबाबत माहिती मिळताच पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी संबंधित गुन्हेगाराला तत्काळ अटक करण्याचे आदेश दिले.

घटनास्थळावरील नागरिकांकडे पोलीसांनी चौकशी केली.परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. संभाषण ध्वनिमुद्रित (कॉल रेकॉर्डिंग) तपासण्यात आले. त्यामध्ये जीवघेण्या हल्ल्याच्या घटनेत गुन्हेगार प्रशांत याचाही सहभाग असल्याचे समोर आले. त्यानंतर तात्काळ प्रशांत याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली. प्रशांत हा पिंपरी-चिंचवड शहरातील कुख्यात गुन्हेगार आहे. त्याच्यावर खून, खुनाचा प्रयत्न, हत्यारबंदी, जबरी चोरी यासारखे १९ गंभीर गुन्हे दाखल आहेत. दरम्यान, या प्रकरणात कामात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवत चव्हाण यांना निलंबीत करण्याचे आदेश पोलीस आयुक्त चौबे यांनी दिले.

### वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या भूमिकेचे स्वागत

» या प्रकरणाची माहिती वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना मिळताच त्यांनी तातडीने कारवाई करत चव्हाण यांना निलंबित केले. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी राजकीय दबावाला न जुमानता कठोर पावले उचलल्याने नागरिकांमधून समाधान व्यक्त होत आहे.

# आंबेमोहर तांदळाला 'अच्छे दिन'; देशासह परदेशातून मागणीमुळे हंगामाच्या सुरुवातीस दरवाढ

## परदेशात देखील मोठी मागणी असल्याने याची निर्यात केली जाते, यामुळे आंबेमोहर तांदळाच्या सध्याच्या भावात 15 ते 20 टक्क्यांची वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

सुवासिक असेलेल्या आंबेमोहर तांदळाच्या हंगामाला सुरूवात झाली असून या तांदळाची मागणी वाढल्याने आंबेमोहर तांदळाच्या दरात वाढ झाली आहे. डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात आंबेमोहर तांदळाची आवक होण्यास सुरूवात होते. या तांदळाला परदेशात देखील मोठी मागणी असल्याने याची निर्यात केली जाते. यामुळे आंबेमोहर तांदळाच्या सध्याच्या भावात १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली आहे. या कारणामुळे आंबेमोहर तांदूळ महाग झाल्याची माहिती मार्केट यार्डातील व्यापाऱ्यांनी दिली.

सुंगधी आंबेमोहर तांदळाची ओळख तांदळांचा राजा म्हणून केली जाते. राज्यात बाराही महिने हा तांदूळ वापरला जातो. पुणे, मुंबईसह इतर ठिकाणी देखील या तांदळाला मोठी मागणी आहे. वर्षभर वापरल्या जाणाऱ्या बासमती, आंबेमोहर, इंद्रायणी, सुरती कोलम या तांदळापैकी सुंगधीत आंबेमोहर तांदळाला चांगली मागणी आहे. गेल्या वर्षी या तांदळाला प्रतिक्विंटल साडेसात हजार रुपये दर मिळाला होता. आता घाऊक बाजारात आंबेमोहर तांदळाच्या दरांत वाढ झाली असून आठ ते नऊ हजार रुपये दर मिळाला आहे.

सुगंधी आंबेमोहर तांदळाचा राजा म्हणून ओळखला जातो. हा तांदूळ महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे बारा महिने वापरला जातो. विशेषतः पुण्यात आंबेमोहर तांदळाला खूप मोठी मागणी आहे. परंतु यावर्षी पुणेकरांना आंबेमोहर तांदूळ 10 ते 15 रुपये प्रतिकिलो महाग खरेदी करावा लागणार आहे. वर्षभर वापरल्या जाणाऱ्या वासमती, आंबेमोहोर, इंद्रायणी व सुरती कोलम या तांदळापैकी आंबेमोहोरला चांगली मागणी आहे. यावर्षी बासमती तांदळाच्या दरांपर्यंत आंबेमोहर तांदळाचे दर पोहोचतील, असा अंदाज वर्तविण्यात येत आहे. त्याचबरोबर आंबेमोहर तांदळाचे दर हे यावर्षी कमी होण्याची शक्यता खूप कमी असल्याचा अंदाज वर्तविला.

केंद्र सरकारने नॉन बासमती तांदळावरची उठवलेली निर्यात बंदी आणि निर्यात कर कमी केल्यामुळे आंबेमोहर तांदळाला परदेशातून मोठी मागणी वाढली आहे. त्यामुळे नवीन हंगामाच्या सुरुवातीलाच आंबेमोहर तांदळाचे भाव गेल्या वर्षीच्या तुलनेत 15 ते 20 टक्क्यांनी वाढले आहेत. गेल्यावर्षी सीझनच्या सुरुवातीला हे दर 7000 ते 7500 निघाले होते. यंदा घाऊक बाजारात प्रतिक्विंटलचे भाव 8000 ते 9000 रुपयांवर पोहोचले आहेत. सुमारे 500 ते 1000 रुपये प्रतिक्विंटलने आंबेमोहर तांदळाची भाववाढ झाली आहे. त्यामुळे चवीसाठी प्रसिद्ध असलेल्या सुगंधी आंबेमोहर तांदूळ यंदा महागला आहे.



### महाराष्ट्रातून आंबेमोहर तांदळाची लागवड होतेयं कमी

» आंबेमोहर या तांदळाची सर्वाधिक लागवड ही मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेश या दोन राज्यात घेतली जात असली तरी महाराष्ट्रात देखील या तांदळाचे मोठ्या प्रमाणावर उत्पन्न घेतले जात होते. पुणे, मावळ, भोर आणि कामशेत या ठिकाणी मोठ्या प्रमाणात या तांदळाची लागवड केली जाते. मात्र, या ठिकाणी झपाट्याने या भागात वाढलले शहरीकरण या थेट परिणाम या तांदळाच्या लागवडीवर झाला. या कारणामुळे शेतकऱ्यांनी येथील जमिनी विकून टाकल्या. या तांदळाची लागवड कमी झाल्याने महाराष्ट्रातून या तांदळाची मागणी कमी होत चालली आहे.

### ...यंदा आंध्रात लागवड कमी

» आंबेमोहर तांदळाची सर्वाधिक मागणी पुणे, मुंबई या ठिकाणी असते. तसेच या तांदळाला परदेशात देखील मोठी मागणी असून त्याची निर्यात त्या ठिकाणी केली जाते. या तांदळाची सर्वाधिक लागवड मध्यप्रदेश आणि आंध्रप्रदेशात करण्यात येत असते. मात्र, यावर्षी आंध्रप्रदेश राज्यात या तांदळाची लागवड कमी प्रमाणात करण्यात आली आहे. तसेच बिगर बासामती तांदळावरील निर्यात बंदी हटवल्याने जागेवरच आंबेमोहरची मोठ्या प्रमाणात खरेदी केली जात आहे.

# पेरणे ग्रामपंचायत करणार भीम अनुयायांचे स्वागत

## दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पुणे मार्गे येणाऱ्या भीम अनुयायांचे पेरणे ग्रामपंचायत व ग्रामस्थ स्वागत करणार आहेत, अशी माहिती पेरणेच्या सरपंच उषा दशरथ वाळके यांनी दिली.

**पुणे | प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पुणे मार्गे येणाऱ्या भीम अनुयायांचे पेरणे ग्रामपंचायत व ग्रामस्थ स्वागत करणार आहेत, अशी माहिती पेरणेच्या सरपंच उषा दशरथ वाळके यांनी दिली.

मागील आठवड्यात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आढावा बैठक घेतली. यावेळी पोलीस प्रशासनासह सर्व संबंधित शासकीय विभागाच्या अधिकाऱ्यांकडून चाललेल्या तयारीची माहिती घेत पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, आरोग्य सुविधा, पार्किंग व्यवस्था, वाहतूक नियोजन आदी विषयांवर महत्वपूर्ण अशा सूचना संबंधित अधिकाऱ्यांना पवार यांनी दिल्या.

यांनतर वाळके या प्रासारमाध्यमांशी बोलत होत्या. यावेळी शिरूर हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर कटके, प्रभारी जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा पोलीस अधिक्षक पंकज देशमुख, पेरणेच्या उपसरपंच सुजय वाळके, कोरेगाव भीमाचे सरपंच संदीप ढेरंगे, पेरणे ग्रामपंचायत सदस्य अशोक कदम, अश्विनी ठोंबरे, गणेश येवले, अंकिता सरडे, अक्षय वाळके, शैला ढेरंगे, सुनील अवचार, विश्वास वाळके, कल्पना वाळके, दिनेश वाळके, दीपक वाघमारे, मंगल विमाने, अलका वाळके, माधुरी वाळके, ग्रामसेवक कानिफनाथ थोरात तसेच संबंधित इतर विभागांचे अधिकारी व कर्मचारीही उपस्थित होते.

सरपंच वाळके म्हणाल्या, जिल्हा प्रशासन व पोलीस प्रशासनाला पेरणे ग्रामपंचायत व ग्रामस्थ दरवर्षी सहकार्य करत असतात. येणाऱ्या भीम अनुयायांच्या सोयीसाठी पेरणे ग्रामपंचायत सोयीसुविधा देत असते. दरवर्षी भीम अनुयायांची संख्या वाढत आहे त्यामुळे येणाऱ्या अनुयायांना चांगल्या सुविधा पुरवता याव्यात यासाठी प्रशासनाने ग्रामपंचायतला अधिकचा निधी देण्याची मागणी प्रशासनाकडे करण्यात आली आहे. त्यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सकारात्मकता दाखवत जास्तीचा निधीचा देण्याचे आश्वासन दिले आहे.



> एक जानेवारीला दरवर्षी विजयस्तंभ ला अभिवादन करण्यास लाखो अनुयायी येत असतात त्यांचं पेरणे ग्रामस्थ स्वागत करतात. दरम्यान अभिवादन कार्यक्रमासाठी विजयस्तंभ परिसरातील स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी कार्यक्रमासाठी अधिग्रहित करत असताना शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित नुकसान भरपाई मिळावी यासाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन देण्यात आले आहे.
>
> - सुजय सुदाम वाळके, उपसरपंच पेरणे.